**डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला**
**अर्थ प्रशासन विभाग**
**पी.ओ. कृषि नगर, अकोला -४४४ १०४ (महाराष्ट्र)**

जा.क्र.अप्रवि/अलेप/ 23 /२०२३ दिनांक: 28/०४/२०२३

# परिपत्रक

**विषय : प्रलंबित लेखा परिक्षण आक्षेपांच्या पुर्ततेबाबत.**

विद्यापीठातील सर्व नियंत्रण अधिकारी/ विभागप्रमुख / कार्यालय प्रमुख/ आहरण व संवितरण अधिकारी यांना कळविण्यात येते की, स्थानिक निधी लेखा परिक्षण कार्यालय, अकोला यांच्य मार्फत विद्यापीठातील विविध महाविद्यालये, विद्यालये, संशोधन केंद्रे, संलग्न संस्था व तसेच विविध योजना व कार्यालयांचे सन २०१६-१७ पर्यंत लेखा परिक्षण पूर्ण करण्यात आले असून त्याबाबत चे लेखा परिक्षण अहवाल या कार्यालयास प्राप्त झालेले आहेत.

त्या अनुषंगाने विद्यापीठातील विविध महाविद्यालये, विद्यालये, संशोधन केंद्रे, संलग्न संस्था व तसेच विविध योजना व कार्यालयांचे सन १९७४-७५ पासुनच्या लेखा परिक्षण अहवालातील काही परिच्छेद अद्याप पर्यंत निकाली काढून त्यांचा निपटारा करण्यात आलेला नाही. त्यामुळे लेखा परिक्षण अहवालातील प्रलंबित परिच्छेदांची संख्या वाढत आहे. ही प्रशासकीय दुष्टया गंभीर बाब आहे.

महाराष्ट्र कृषी विद्यापीठ लेखासंहिता १९९१ च्या ३.४३ मधील तरतुदीमध्ये संबंधित कार्यालयानी त्यांचे कडील प्रलंबित लेखा आक्षेप/ परिच्छेद त्वरीत निकाली काढण्यास्तव निर्देशीत आहे. तसेच शासन स्तरावरुन लेखा परिच्छेदांच्या निपटाऱ्याबाबत सतत विचारणा होत आहे. त्यानुसार या कार्यालयाकडून वारवांर संबंधित नियंत्रण अधिकारी व आहरण व संवितरण अधिकारी यांना लेखा आक्षेपांची/ परिच्छेदांची पुर्तता करणेबाबत या पुर्वी कळविलेले आहे. करीता नियंत्रण अधिकारी यांच्याकडील व त्यांच्या अधिनस्त आहरण संवितरण अधिकारी यांचेकडे प्रलंबित असलेल्या लेखा आक्षेपांची पुर्तता करणेबाबत वैयक्तीकरीत्या लक्ष देऊन संबंधितांकडून आक्षेपांची पुर्तता करण्यात यावी.

प्रलंबित परिच्छेदातील आक्षेपांची पुर्तता ही अचूक, स्पष्ट अभिप्राय व त्या आक्षेपांच्या संबंधीत योग्य त्या दस्तऐवजासह प्रमाणित करुन या कार्यालयाकडे तात्काळ पडताळणी करीता सादर करावे, जेणेकरुन प्रलंबित लेखा आक्षेपांचा निपटारा हा त्वरीत होऊन प्रलंबित परिच्छेदांची माहिती शासनास सादर करता येईल.

नियंत्रक
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
अकोला

प्रत :१) नियंत्रण अधिकारी (सर्व)/आहरण व संवितरण अधिकारी(सर्व)/विभागप्रमुख (सर्व) यांना कार्यवाहीस्तव
२) कुलसचिव, डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला यांना माहितीस्तव.
३) कुलगुरु यांचे स्वीय सहायक, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला यांना मा.कुलगुरु यांच्या माहितीकरीता.
४) वेतन व लेखाधिकारी, डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला / नागपूर.
५) प्रभारी अधिकारी,संगणक प्रणाली कक्ष,डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला यांना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर